# "गटनिरपेक्ष तत्त्वज्ञानात तिसऱ्या महायुद्धाचा धोका दूर करण्याची क्षमता" - चिकित्सक वेध

डॉ. संदीप विलासराव घोडके, नवी मुंबई

गोषवारा

दुसऱ्या महायुद्धानंतर तटस्थ देशांनी आपली शक्ती निर्माण करावी म्हणून पंडित नेहरू, मार्शल टिटो आणि इजिप्तचे हुकूमशाह नासर यांनी केलेले प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झालेले दिसून आले. पंडित नेहरू यांचे विविध क्षेत्रातील विचार व कार्य उल्लेखनीय अशा प्रकारचे आहे. त्यातल्या त्यात आंतरराष्ट्रीय संबंध व विदेश नीती याबाबतचा त्यांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त होता. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील परराष्ट्र धोरणाची पायाभरणी पंडितजींच्या विचार व पुढाकाराने झाली अशी मान्यता आहे. एवढेच नव्हे तर दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी दोन महान अशा लष्करी गटात होत असताना अशा महत्त्वाच्या टप्प्यात कोणत्याही गटात सहभागी न होता नवराष्ट्र - राज्यांनी ते आकाराने लहान व लोकसंख्येने ही कमी असले तरीही स्वतःचे अस्तित्व टिकवून स्वाभिमान व स्वातंत्र्य अबाधित ठेवून तटस्थ म्हणजेच अलिप्त रहावे.

बिजसंज्ञा: गटनिरपेक्ष तत्त्वज्ञान, महायुद्ध, चिकित्सक वेध

## प्रस्ताविका :-

दुसऱ्या महायुद्धानंतर तटस्थ देशांनी आपली शक्ती निर्माण करावी म्हणून पंडित नेहरू, मार्शल टिटो आणि इजिप्तचे हुकूमशाह नासर यांनी केलेले प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झालेले दिसून आले.

पंडित नेहरू यांचे विविध क्षेत्रातील विचार व कार्य उल्लेखनीय अशा प्रकारचे आहे. त्यातल्या त्यात आंतरराष्ट्रीय संबंध व विदेश नीती याबाबतचा त्यांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त होता. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील परराष्ट्र धोरणाची पायाभरणी पंडितजींच्या विचार व पुढाकाराने झाली अशी मान्यता आहे. एवढेच नव्हे तर दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी दोन महान अशा लष्करी गटात होत असताना अशा महत्त्वाच्या टप्प्यात कोणत्याही गटात सहभागी न होता नवराष्ट्र - राज्यांनी ते आकाराने लहान व लोकसंख्येने ही कमी असले तरीही स्वतःचे अस्तित्व टिकवून स्वाभिमान व स्वातंत्र्य अबाधित ठेवून तटस्थ म्हणजेच अलिप्त रहावे. या पद्धतीचा आग्रह आंतरराष्ट्रीय समुदायास पंडित नेहरूंच्या पुढाकाराने केल्यामुळे जगातील आशिया, आफ्रिका खंडातील बहुतांश देशांना दोन्ही गटात सहभागी न होता अलिप्त राहून आपल्या देशाच्या उन्नतीचा विचार करणारा तिसरा आणि महत्त्वाचा पर्याय म्हणजेच इंडोनेशियाचे सुकार्णोंचे विचार व पंडित नेहरूंचे तटस्थतेचे तत्त्वज्ञान मैलाचा दगड ठरले, खूप उपयोगी पडले हे नाकारणे अवघड आहे.

वास्तविक विदेश संबंध हे अत्यंत अस्थिर व नित्य बदलत्या संतुलनाचे क्षेत्र असते. त्यात एखादे धोरण इतकी अनेक वर्षे आपली प्रस्तुतता कायम राखते याचा अर्थ असा

की ,त्या धोरणात बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा लवचिकपणा समाविष्ट आहे.

१९९१ नंतर जागतिक पातळीवरील जागतिकीकरणाच्या बदलामुळे भारताला सुद्धा आपल्या परराष्ट्र धोरणाच्या तत्त्वांमध्ये काही तडजोडी करणे क्रमप्राप्त ठरले. समकालीन भारतीय सरकारकडून आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या बदलत्या प्रवाह अनुरुप काही धोरणात्मक बदल आवश्यक वाटत आहेत, या अनुषंगाने अलिप्तता वादाच्या विचाराच्या अंगाने " जागतिक शांतता" या महत्त्वाच्या मुद्याकडे बदलत्या परिस्थितीत दृष्टिक्षेप टाकून त्याचे विवेचन सर्वांच्या समोर अभ्यासाकरिता ठेवण्याच्या हेतूने सदरचा संक्षिप्त शोध प्रपंच मांडण्याचा प्रयत्न आहे.

पंचशील मधून तटस्थ विचाराचा उगम :- अलिप्तता वादाच्या जनकत्वाचे श्रेय नेहरूंनी स्वतःकडे कधीच घेतले नव्हते ते असे म्हणत की," अलिप्ततावाद हा भारताच्या पूर्व इतिहासात, परिस्थितीत, जीवन विषयक दृष्टिकोनात, स्वातंत्र्याची आकांक्षा, मानसिकतेत आणि जगाच्या सद्यस्थितीत अंतर्भूत होता." तरीसुद्धा पंडित नेहरूंच्या " पंचशील" तत्त्वातून अलिप्त किंवा तटस्थ एक धोरण म्हणून आकारास आल्याचे दिसते. १) प्रत्येक देशाला स्वायत्तता व स्वातंत्र्य असावे.

२) प्रत्येक देशाने परस्पर देशांचे सार्वभौमत्व मान्य करावे.

३) समानतेच्या भूमिकेतून कोणत्याही देशावर आक्रमण न करता परस्पर देशांचा मान व प्रतिष्ठा राखावी.

४) कोणत्याही देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

५) शांततापूर्ण सहजीवन, अस्तित्व पद्धती स्वीकारणे व प्रत्यक्ष कृतीत आणणे.

या पंचशील तत्त्वांचा पुरस्कार पंडित नेहरूंनी शांतता महेश सहजीवन अस्तित्वाच्या तत्त्वातून केला आणि त्यास ब्रह्मदेश , चीन व झेकोस्लाव्हिया या अशा देशांनी मान्यता दिली होती. अलिप्ततावादी धोरण काय होते? आणि अलिप्त राष्ट्र चळवळ का उभी राहिली ? या मागची भुमिका बाबत नेहमीच विश्लेषकांमध्ये उत्सुकता राहिली आहे. १९२१-१९४६ दरम्यान सातत्याने अलिप्तता वादाच्या तत्त्वाला अनुरूप अशी भूमिका घेणारे काँग्रेसमधील नेहरू हे एक नेते होते. एका बाजूने पाश्चात्य उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेचे जसे नेहरूंना आकर्षण होते तसेच दुसऱ्या बाजूने क्रांतोत्तर रशियाने नियोजनातून साधलेल्या नेत्र दीपक प्रगतीचेही होते आणि त्यातूनच त्यांची मिश्र अर्थव्यवस्थेची संकल्पना किंवा लोकशाही समाजवादाची धारणा साकारली गेली होती. कोणत्याही एका विचारसरणीशी हा देश जखडला जाता कामा नये . कारण त्या सर्वच विचारप्रणाली या देशावर भिन्न असलेल्या युरोपीय पार्श्वभूमी मधून प्रादुर्भूत झालेल्या आहेत. हीच नेहरूंची धारणा अलिप्तता वादाच्या तत्वज्ञानातून व्यक्त झाली आहे. भांडवलशाहीतील स्वार्थांधता नको आणि साम्यवादा तील अधिकारशाही नको या मनोवृत्तीचे प्रतिबिंब या तटस्थ चळवळीमध्ये उमटले आहे.

तटस्थ चळवळीचा विकास :-

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर निरपेक्ष गट बनवण्याची चर्चा सुरु होती. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकासारखे देश एकत्र येऊन एक नवे संघटन तयार

करण्याचा प्रयत्न करत होते. सध्या हे संघटन काही अंशी शिथील झाल्याचे दिसत आहे.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर संपूर्ण जग या युद्धाच्या भयावह परिणामांनी हादरून गेले होते. संपूर्ण जग दोन भागात विभागले गेले होते. अमेरिका आणि सोव्हिएत संघ हे दोन देश जागतिक मंचावर प्रमुख महासत्ता म्हणून उदयास आले होते. प्रत्येक देश कोणत्या तरी एका महासत्तेच्या बाजूने उभा असलेला दिसत होता.

यात भारतासारखे काही देश होते, ज्यांना नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते. अशा गरीब राष्ट्रांना कोणत्याही एका महासत्तेच्या बाजूने उभे राहणे अजिबात परवडणारे नव्हते. कारण अशा देशांचे या महासत्तांच्या हातातील खेळणेच झाले असते. गरीब देशांना या महासत्तांच्या गटबाजीत पडल्याने फायद्याऐवजी तोटाच जास्त झाला असता.

या महासत्तांच्या पटावरील प्यादे बनण्यापेक्षा गरीब आणि विकसनशील राष्ट्रांनी यांच्या गटबाजीपासून अलिप्त राहावे असा विचार मांडण्यात आला. यातूनच अलिप्त राष्ट्रांची चळवळ उभी राहिली आहे.

तटस्थ तत्वज्ञान : -

रोमेश थापर यांच्या मते नेहरूंच्या दृष्टिकोनामुळे अलिप्ततावाद हे केवळ एक धोरण न राहता जगातल्या अनेक राष्ट्रांसाठी ते एक भावात्मक तत्त्वज्ञान झाले आणि महासत्तांमधील संघर्षाला आटोक्यात ठेवण्याची क्षमता आणि संधी त्यांना त्यातून लाभली.

अनेक प्रकारच्या परराष्ट्रीय धोरणांपैकी अलिप्तता हे एक धोरण आहे. आंतरराष्ट्रीय राजकीय गटांपासून व लष्करी संघटनांपासून अलग राहणे म्हणजे अलिप्तता होय.

युध्यमान राष्ट्रांच्या संदर्भात युद्धात सहभागी नसलेल्या राष्ट्राने निःपक्षपाती वागणूक ठेवणे ह्यास 'तटस्थता' म्हणतात. युध्यमान राष्ट्रांच्या न्याय्य अगर अन्याय्य कृतीचा विचार तटस्थतेत अप्रस्तुत असतो. याउलट अलिप्ततेचे धोरण स्पष्ट करताना पं. नेहरूंनी म्हटले आहे, की भारत कोणत्याही लष्करी गटात सामील होणारा नाही. दोन गटांत संघर्ष निर्माण झाल्यास शांततामय मार्गाने संघर्ष मिटविण्याचा प्रयत्न भारत करील, परंतु संघर्ष अटळ ठरल्यास आपल्या हितासाठी अगर जागतिक शांतेतच्या दृष्टीने योग्य वाटेल ती भूमिका घेण्यास भारत स्वतंत्र राहील.

भारताखेरीज संयुक्त अरब प्रजासत्ताक, इंडोनेशिया, घाना, यूगोस्लाव्हिया, स्वीडन वगैरे सुमारे ३५ स्वतंत्र राष्ट्रांनी अलिप्ततेचे धोरण स्वीकारले . लष्करी दृष्ट्या अलिप्तता स्वीकारूनही समान समस्यांमुळे वा संस्कृतीमुळे अलिप्ततावादी देशांमध्ये सहकार्य निर्माण होणे हितकारक आहे, या जाणिवेतूनच अलिप्त राष्ट्रांची परिषद भरवून, जागतिक प्रश्नांसंबंधी विचारविनिमय करून समान कार्यपद्धती ठरविण्याची प्रथा सुरू झाली. उदा., आफ्रो-आशियाई परिषद.

जो आपल्या बाजूला नाही तो विरुद्धच असला पाहिजे, असे समजण्याची प्रवृत्ती दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या रशिया व अमेरिका या दोन सत्तागटांच्या पुरस्कर्त्यांमध्ये दिसू लागली. या प्रवृत्तीला अलिप्त राष्ट्रांच्या अस्तित्वामुळे आळा बसेल आणि जगात अलिप्त राष्ट्रांची संख्या जसजशी वाढत जाईल, तसतसे

शांततेचे क्षेत्र विस्तृत होत जाईल व त्या प्रमाणात जागतिक युद्धाचे भय कमी होईल, अशी अलिप्ततावादी धोरणाच्या पुरस्कर्त्यांची श्रद्धा होती.

परंतु गेल्या दशकात बडे राष्ट्र म्हणून चीनचा उदय झाल्याने व जागतिक सत्तास्पर्धेत सर्वश्रेष्ठ स्थान मिळविण्यासाठी चीनने स्वीकारलेली भूमिका संधिसाधूपणाची असल्याने जागतिक राजकारणाला वेगळेच वळण मिळाले आहे. अलिप्ततेच्या तत्त्वालाही हे नवे आव्हान ठरत आहे. १९६२ मधील चीनच्या भारतावरील आक्रमणाने या आव्हानाची पहिली लक्षणे प्रकट झाली. भौगोलिक दृष्टीने आशिया खंडातील चीनचे भारताला लागून असलेले स्थान आणि सर्वंकष जागतिक चिनी वर्चस्वाची स्वप्ने पाहणारे चिनी राज्यकर्ते जेथे रशिया—अमेरिकेसारख्या बड्या सत्तांनाच आव्हान देत आहेत, तेथे आफ्रो-आशियाई राष्ट्रांचे अलिप्ततेचे धोरण कितपत यशस्वी होईल ? हा एक गंभीर प्रश्नच आहे.

भारत व तटस्थ विचार :-

तटस्थतेचे धोरण भारतासाठी सर्वोत्तम आहे असे नेहरूंचे ठाम मत होते. केवळ आजच नव्हे तर नेहमीसाठीच भारताला या करीत दुसरा पर्याय नाही. येथे कोणताही पक्ष सत्य असो सर्व व्यवहारिक तथ्य तपासल्यानंतर त्याला हेच धोरण स्वीकारावे लागेल, याबद्दल नेहरूंना शंका नव्हती . मात्र अलिप्तता वादाचा विचार करताना त्यांनी आपले लक्ष भारतापुरते कधीच सीमित ठेवले नव्हते. आशिया - आफ्रिका खंडातील सर्व उदयनमुख राष्ट्रांचा विचार त्यांच्या मनात होता. एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय संबंधातील या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची मोजपट्टी म्हणून अलिप्तता वादाकडे ते बघत होते. त्या नवस्वतंत्र देशांच्या हाती या चळवळीतून एक निर्णायक शक्ती यावी आणि जागतिक शांतता व सुरक्षितता या कामासाठी तिचा वापर व्हावा ही त्यांची अपेक्षा होती. दोन महासत्तांपासून किंवा लष्करी करारापासून दूर राहणे एवढ्या नकारात्मक संदर्भात त्यांची तटस्थतेची संकल्पना नव्हती. तिसऱ्या जगातील राष्ट्रांना संघटित करून स्वाभिमानाने जागतिक राजकारणात वावरता यावे या सकारात्मक भूमिकेतून अलिप्ततावाद विचारधारा विकसित झाली.

तटस्थतेची समकालीन शांततावादी उपयोगिता :-

भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या अलिप्ततावादी धोरणावर टीका केली आहे. त्यांच्या मते अलिप्ततावादी धोरण भारतासाठी एकेकाळी चांगले होते. पण, भारत आता खूप पुढे गेला आहे. तेंव्हा हे धोरण आता भारतासाठी आवश्यक नाही, असे त्यांचे मत आहे.

एस. जयशंकर यांच्या मताशी सहमत असणारे आणि नसणारे अनेक लोक आता या चर्चेत सहभागी होऊन आपापले विचार व्यक्त करतील. तसे या चळवळीची स्थापना झाल्या पासूनच चर्चा, मतमतांतरे सुरु होती. या चळवळीचे मुख्यालय इंडोनेशियाची राजधानी जकार्ता येथे आहे.

अलिप्त राष्ट्र चळवळ हा जागतिक स्तरावरील दोन क्रमांकाची संघटना होती. ज्यामध्ये १२० सदस्य राष्ट्रे आणि १७ पर्यवेक्षक राष्ट्रे आहेत.

परंतु, सद्य परिस्थितीत या चळवळीचा प्रभाव कमी झाला आहे. विशेषतः ९०

च्यादशकानंतर जगात वेगाने बदल झाले. सोव्हिएत संघ विखुरला गेला. आता तर सोव्हिएत महासत्तासुद्धा राहिला नाही. उलट आज चीन महासत्तेच्या रुपात समोर आला आहे. इतर देशही या महासत्ताच्या प्रभावापासून स्वतःला अलिप्त ठेवण्यास असमर्थ आहेत. आज अनेक देश कोणत्या तरी एका महासत्तेच्या बाजूने उभा राहण्याच्या प्रयत्नात दिसतो.

अलिप्त राष्ट्र चळवळीची संमेलने आजही भरवली जातात. गेल्याच वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी नामच्या (NAM) संमेलनाला हजेरी लावून आले. यापूर्वी देखील माजी पंतप्रधान मनमोहन सिंग देखील या संमेलनासाठी जाऊन आले होते. इंदिरा गांधींच्या काळात नामचे एक मोठे संमेलन भारतात भरवण्यात आले होते.

१९६२ साली भारत आणि चीनमध्ये युद्ध झाले तेंव्हा अलिप्त राष्ट्र चळवळ भारताच्या बाजूने उभी राहील, चीनच्या विस्तारवादी आणि आक्रमक धोरणाला विरोध करेल अशी नेहरुंना आशा होती. मात्र प्रत्यक्षात अलिप्त राष्ट्र चळवळीने भारताची बाजू घेतली नाही.

तेंव्हा अमेरिका भारताच्या बाजूने उभा राहिला आणि भारताला शस्त्रास्त्रांची मदत केली. शिवाय, अमेरिकेने चीनवर दबाव देखील आणला. या युद्धात अलिप्त राष्ट्र चळवळीची भूमिका फारच संदिग्ध होती. या संघटनेतील मोजकेच देश भारताच्या बाजूने उभे राहिले होते.

शोधनिबंधसार वजा शिफारस :-

गटनिरपेक्ष राष्ट्रीय देश आकाराने लहान असले तरी संख्येने आणि लोकसंख्येने फार मोठी झाली तर ती खूप काही करू शकतात म्हणून त्यांनी एकत्र यावे असे आवाहन त्यावेळी केले गेले. अलिप्ततावादी विचारसरणीच्या नेत्यांचा सदहेतूमूलक सल्ला आज लहान देशांना खूप उपयुक्त वाटतो आहे. हे गटनिरपेक्ष चळवळीतील वाढत्या सदस्य संख्येवरून दिसते. आज गटात असलेल्या देशांपेक्षा गटनिरपेक्ष देशांची संख्या कितीतरी मोठी झाली असून जगाच्या दोन तृतीयांश लोकसंख्या अलिप्तता वादाचा पुरस्कार करू लागली आहे. त्यामुळे ही चळवळ स्थिरपद व अधिकाधिक उपयुक्त ठरत आहे. सर्वसंहारक युद्ध आजवर टाळण्याचे संपूर्ण श्रेय कदाचित या चळवळीला देता येणार नाही. परंतु तिने जागतिक शांततेच्या संदर्भात लक्षणीय कामगिरी केलेली आहे. हे कोणीच नाकारू शकणार नाही. या माध्यमातूनच तिसऱ्या महायुद्धाचा धोका नेहमी नेहमी दूर दूर जात आहे. ही वास्तविकता स्वीकारणे आवश्यक आहे.

काँग्रेस नेते आणि संयुक्त राष्ट्रात प्रतिनिधी राहिलेल्या शशी थरूर यांचं पुस्तक 'नेहरू- द इन्व्हेंशन ऑफ इंडिया' या पुस्तकात शशी थरुरांनी लिहिलं आहे की ,१९५३ च्या सुमारास भारताला संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचं सदस्यत्व देण्याचा प्रस्ताव मिळाला होता. मात्र तेव्हा ती जागा चीनला दिली गेली.

आज अलिप्तवादाच्या उपयुक्ततेबाबत चर्चा होत असली तरी सुद्धा स्वातंत्र्यानंतरचा काळ आठवणे व त्याची वास्तविकता पाहणे गरजेचे आहे.

अलिप्त देशांनी महासत्तांवर विविध प्रसंगी दडपण आणून नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करण्याचा खटाटोप सुरू ठेवावा. पण त्याच वेळी त्यांनी आपण स्वतः आपले प्रश्न सोडवण्यासाठी आपण काय करू शकतो ? याचाही अधिक गंभीरपणे विचार व प्रयत्न

करण्याची आज निकड आहे . सर्व अलिप्त राष्ट्रांनी आपली आर्थिक व तंत्रज्ञानात्मक व मानवी साधनसामग्री संकलित करून गरजेनुसार तिचा योग्य त्या जागी वापर करायला शिकले पाहिजे. " स्वावलंबना शिवाय खरी राजकीय अलिप्तता अस्तित्वात येऊ शकत नाही , हे जसे पंडित नेहरूंचे विधान होते, तसेच सध्याचे भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भरतेचा चालवलेला प्रयत्न सर्व क्षेत्रातील परावलंबतवाकडून स्वावलंबत्वाकडे जाणारा उत्तम मार्ग असू शकतो."

भारतीय परराष्ट्र मंत्री व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे प्रसिद्ध अभ्यासक डॉ. एस जय शंकर यांच्या बाबत असे ऐकले आहे की, अलिप्तता वादाच्या समकालीन उपयुक्ततेबाबत ते नकारात्मक आहेत. तरीसुद्धा प्रत्यक्षात शांती राजनयाचा प्रभाव त्यांना सुद्धा चीन व युक्रेन प्रश्नाबाबत नाकारता आला नसेल. स्वातंत्र्यानंतर तटस्थवाद ही गरज होती. अन्यथा दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या देशांना स्वातंत्र्य मिळवूनही आपण राजकीय पारतंत्रात ओढले गेलो आहोत याची जाणीव झाली असती. गतवर्षी जगाने अनुभवलेले रशिया - युक्रेन युद्ध याबाबत भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदींचा दृष्टिकोन किंवा शांततावादी राजनया मुळे तिसऱ्या महायुद्धाचे संकट काही प्रमाणात टाळल्याचे जागतिक स्तरावरून बोलले जाते. त्याचप्रमाणे कोरोना संक्रमण वैश्विक काळात संघर्षातही चीन बाबत भारताचा शांततावादी संयमाचा प्रयत्न पुन्हा अधोरेखित करतो की, शांतीमय धोरण व मध्यस्थी जागतिक युद्ध टाळून वैश्विक शांती निर्मितीचा समकालीन प्रमुख आधार होऊ शकतो.

संदर्भसूची:-

१) भा.ल.भोळे - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
२) रोमेश थापर - नेहरू अँड दि मॉडर्न वर्ल्ड.
३) शशी थरुर ‘नेहरू- द इन्व्हेंशन ऑफ इंडिया’
४) डॉ. एस. जयशंकर - वृत्तपत्र
५) इंडोनेशियाचे सुकार्णोंचे विचार
६) डॉ. संदीप घोडके - " अलिप्ततावादाची समकालीन शांतिवादी उपयुक्तता " - एक संक्षिप्त चिकित्सा. .
.